# भारतीय राजकारणातील प्रादेशिक पक्षाचा प्रभाव

प्रा. मेजर घनवट मोहन विभाग प्रमुख — राज्यशास्त्र विभाग, मुधोजी कॉलेज, फलटण

---

**प्रस्तावना** ः राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षाचे स्थान महत्त्वपूर्ण असते. लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्ष हे त्या व्यवस्थेतील आवश्यक घटक असतात कारण ते शासन व जनता यांच्यातील दुवा साधण्याचे कार्य करतात. ज्या व्यवस्थेत राजकीय पक्षांचा प्रभाव कमी असतो तेथे लोकांचा सहभाग व्यवस्थेत मर्यादीत असतो आणि तेथील लोकशाही व्यवस्था दुबळी असते. भारतीय संसदीय लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांचे अस्तित दिसून येते व हे पक्ष भारतीय लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनले आहेत. भारत स्वतंत्र झाल्यानंतर झालेल्या १९५२ च्या पहिल्या निवडणूकी पासून राजकीय पक्षांचे प्रभाव दिसतो या राजकीय पक्षांच्या संख्येत प्रादेशिक पक्षांची संख्या जास्त असलेली दिसते. १९७० पर्यत भारतात राष्ट्रीय कांग्रेस पक्ष हा प्रभावी पक्ष होते. त्यामुळे भारतात एक पक्ष पध्दती आहे अशी टिका होवू लागली. पण १९७० नंतर भारतीय राजकीय व्यवस्थेत कांग्रेस पक्षाल पर्यायी इतर पक्षाचा उदय झाला यात प्रादेशीक पक्षाची संख्या अधिक होती व या पक्षांचा १९९० नंतर भारतीय राजकारणात प्रभाव वाढू लागला व भारतात एक पक्षाचे वर्चस्व संपुष्ठात येऊन अनेक पक्षपध्दतीचे युग सूरू झाले. प्रस्तुत लेखात या प्रादेशिक पक्षाचा भारतीय राजकारणात भूमिकेचे विवेचन केले आहे.

**भारतातील राजकीय पक्षांची ऐतिहासिक पार्श्वभूमि** ःभारतीय राजकीय व्यवस्थेत पक्षपध्दती ही ऐतिहासिक विकासातून विकसीत झाली आहे. १९८५ ला भारतीय स्वातंत्र चळवळीच्या निमित्ताने स्थापन झालेले राष्ट्रीय कांग्रेस हे भारतीय राजकीय पक्षाचे पहिल रोपटे होते . राष्ट्रीय कांग्रेस हे भारतीय लोकांचे ब्रिटीश राज्यकर्तांविषयी मत मांडण्याचे एक व्यासपीठ होते.हळूहळु ही संघटना भारतातील ग्रामिण पातळीवरून राष्ट्रीय पातळीवर विस्तारित गेली व तीचे स्वरूप व्यापक बनले . या राष्ट्रीय कांग्रेस पक्षा प्रमाणेच मुस्लीम लीग आणि विविध हितसंबध गटांचे प्रतिनिधीत्व करणारे विविध संघटना निर्माण झाल्या व या संघटना पुढे ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या प्रांतीक कायदेमंडळ व राष्ट्रीय कायदेमंडळाच्या निवडणूकीत राजकीय पक्ष या स्वरूपात निवडणूका लढवल्या. भारत स्वातंत्र झाल्यानंतर भारतातील राजकीय क्षितीज्यावर राष्ट्रीय कांग्रेस पक्षाचा प्रभाव मोठया प्रमाणात पडला कारण कांग्रेस पक्ष हा सर्वसामावेशक पक्ष होता याचे नेतृत्व ही प्रभावित असे होते . पंडीत नेहरू, वल्लभाई पटेल, लाल बहादूर शास्त्री इ. नेत्यांमुळे कांग्रेस पक्षाचा प्रभाव सलग २० वर्ष भारतीय राजकरणात राहीला या वेळी इतर पक्षांचे अस्तित्व होत पण ते प्रभावहीन असे होते.

**भारतीय राजकरणात प्रादेशिक पक्षांचा उदय** ः भारतीय राजकरणात प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व १९४७ ते १९६७ पर्यत प्रभावहीन असेच होते पक्त ते आपले अस्तित्व टिकून होते . १९६७ नंतर भारतातील पंजाब, मध्यप्रदेश ,उडीसा या राज्यामध्ये प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढू लागला.पण येथे जे प्रादेशिक पक्ष निर्माण झालेत ते तेथील प्रादेशिक नेतृत्त्वातूनच उदयाला आलेत. जसे की विरेन्द्रसिंह ची विशाल हरियाण पक्ष , चौधरी चरसिंगची भारतीय कांती पक्ष, अजय मुखर्जीची बंगाल कांग्रेस अशा विविध राज्यामध्ये स्थानिक प्रश्नांचा आधार व प्रभावि नेतृत्त्वातून प्रादेशिक पक्षांची व्याप्ती वाढू लागली. १९९० नंतर भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षाचा दबाव वाढू लागला व ते राज्याच्या राजकारणातून केंद्राच्या राजकारणात सहभागी झाल्या. यावेळी भारतीय राष्ट्रीय कांग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पार्टी , समाजवादी पक्ष , किसान मजदूर प्रजा पक्ष, स्वतंत्र पक्ष , प्रजा समाजवादी पक्ष, अखिल भारतीय हिंदूमहासभा, अखिल भारतीय जनसंघ , झारखंड पार्टी , शेडयुल्ड कास्ट फेडरेशन, द्रविड मुन्नेत्र कळघम, गणतंत्र परिषद, पीपल्स डेमेक्रेटिक प्रीट अशा विविध प्रादेशिक पक्षांचा उदय झाला.

**प्रादेशिक पक्षाच्या उदयाची कारणे** ः

१.**प्रादेशिक विकासाचा असमतोल** ः प्रादेशिक पक्षाच्या उदयामध्ये भारतातील विविध प्रादेशिक विकासाचा असमतोल प्रभावी ठरत असल्याचे दिसते.उदाः झारखांड मुक्ती मोंचा हा पक्ष बिहारमधील खनिजसंपन्न असलेल्या झारखंड प्रदेशाच्या विकासाचा मुदद घेऊन निर्माण झाला आहे.

२.**भाषवार राज्यरचनेच्या चळवळीतू निर्मिती** ः भारतात भाषावार प्रांतरचनेची चळवळ स्वांतत्र नंतर प्रभावी ठरू लागली यातूनच संयुक्त महाराष्ट्र पक्ष हा मराठी भाषिकांचा महाराष्ट्र निर्माण होण्यासाठी, तेलगु भाषीकाच्या व हिंदी भाषेच्या विरोधातील चळवळीतून एआयडीएमके पक्षाची स्थापना झाली.या भाषावार प्रांतरचनेच्या चळवळीतून निर्माण झालेले पक्ष राज्याच्या राजकारणाला प्रभावी ठरल्याचे दिसून येतात.

३.**राज्याच्या अस्मीतेतून प्रादेशिक पक्षाचा उदय** ः भारतातील विविध राज्याती वेगवेगळया प्रादेशिक अस्मिता या तेथील प्रदेशातील समस्यातून निर्माण होत असलेल्या दिसतात व या अस्मिताचा वापर करून अनेक प्रादेशिक पक्षाचा उदय झालेला दिसतो. उदा ः महाराष्ट्रात मराठी अस्मितेवर शिवसेना या प्रादेशिक पक्षाची स्थापना झाली तसेच मनिपूर मध्ये मनीपूर मिझो पार्टी स्थापना झाली.

४.**राष्ट्रीय पक्षातून पूटून प्रादेशिक पक्षाची स्थापना** ः भारतातील प्रमुख राष्ट्रीय पक्षातून पूटून प्रादेशिक स्तरावर पक्ष निर्माण झालेली दिसतात.उदा ःराष्ट्रीय कांग्रेस पक्षातून वेगळा होऊन तृणमूल कांग्रेस पक्ष हा पं.बंगालमध्ये प्रादेशिक पक्ष म्हणून कार्यरत आहे.

वरील मुददयवरून असे दिसून येते की प्रादेशिक पक्षाची निर्मितीत प्रामुख्याने प्रादेशिक अस्मिता तसेच तेथील समस्या या कारणीभूत असलेल्या दिसताता.भारतात १९७० नंतर अनेक प्रादेशिक पक्ष निर्माण झाले या प्रादेशिक पक्षांनी भारतीय राजकारणाची दिशाच बदलून टाकली आहे. या प्रादेशिक पक्षानी निवडणूकीच्या माध्यमातून शासनप्रणालीवर प्रभाव टाकला आहे यामुळे भारतात केंद्रात व राज्यातही एकाच पक्षाचे शासन न येता आघाडीचे शासन येऊ लागले.

**भारतीय प्रादेशिक पक्षाची वैशिष्टे** ः १.भारतीय प्रादेशिक पक्षांचा राज्यात प्रभाव १९६७ नंतर वाढला.

२.भारतीय प्रादेशिक पक्ष हे राज्या पर्यत सिमित राहीले.

३.राज्य स्वायत्तातून यांचा उदय झाला.

४.भारतीय प्रादेशिक पक्षांचा प्रमुख विरोधक कांग्रेस पक्ष असल्याचा दिसतो.

५.प्रादेशिक पक्षांची विचारसरणी संकुचित अशी आहे.

६. प्रादेशिक पक्षांची मर्यादा राज्य विषया संबधीतच आहे.

७.प्रादेशिक पक्षांचा महत्त्वपूर्ण आधार प्रभावशाली नेतृत्त्व होय.

**१९९० नंतर भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षाचे महत्त्व** ः १९९० नंतर भारतातील राजकीय व्यवस्थेत प्रादेशिक पक्षाची कामगीर ही भारताच्या राजकीय व्यवस्थेला कलाटणी देणारी होती. खालील तक्ता वरून आपणास दिसून येते की भारतातील प्रत्येक राज्यात प्रादेशिक पक्षाचे अस्तित्व दिसून येते .व हे प्रादेशिक पक्ष राज्याच्या सत्तेही सहभागी झालेले आहेत.त्यामध्ये पं.बंगाल मध्ये तृणमूल कांग्रेस पक्ष , ओरीसामध्ये बीजू जनता दल ,काश्मिर मध्ये नॅशनल डेमेक्राटीक पक्ष, तामिळनाडूत एआयडीएमके, बिहार मध्ये जनता दल असे प्रादेशिक पक्ष राज्याच्या राजकारणात प्रभावी असून सत्ता त्यांच्याकडे असल्याचे दिसते आणि येथे राष्ट्रीय पक्षाची अवस्था दुबळी असून ते प्रादेशिक पक्षाच्या पाठीमागे असल्याचे दिसते. राज्याच्या राजकारणा प्रमाणेच प्रादेशिक पक्षाचा प्रभाव देशाच्या राजकारणात दिसून येतो.गेल्या काहि लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनमध्ये याचा प्रत्यय येत आहे.

**१३ व्या लोकसभा १९९९ निवडणूक ः**

१९९९च्या लोकसभा निवडणूकीमध्ये ५४३ जागा पैकी १५६ जागा प्रादेशिक पक्षानी जिंकलेल्या दिसतात.वरील तक्तामध्ये १९९९ च्या सार्वत्रिक निवडणूकी

| पक्षाचे नाव | प्राप्त जागा | पक्षाचे नाव | प्राप्त जागा | पक्षाचे नाव | प्राप्त जागा | पक्षाचे नाव | प्राप्त जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अन्ना द्रमुख | १० | केरल कांग्रेस | १ | तेलगू देसम | २९ | प.म.क | ५ |
| शिरोमणि अकाली दल | २ | समाजवदी पार्टी | २६ | मुस्लिम लिग | २ | म.द्रमुख | ४ |
| ऑल इण्डिया फॉरवर्ड ब्लॉक | २ | राष्ट्रीय जनता दल | ७ | भारतीय राष्ट्रीय लोकदल | ५ | बीजू जनता दल | १० |
| नॅशनल कॉन्फ्रेन्स | ४ | द्रविड मुनेत्र कडगम | १२ | सिक्कीम डेमोक्रेटिक फ्रंट | १ | तृणमूल कांग्रेस | ८ |
| शिवसेना | १५ | रिपब्लीक सोशलिस्ट पार्टी | ३ | हिमाचल विकास कांग्रेस | १ | लोकतांन्त्रिक कांग्रेस | २ |
| | | | | एम.जी.आर.द्रमुख | १ | मिझो नॅशनल फ्रंट | १ |

प्रादेशिक पक्षांना मिळालेल्या जागा आहेत यात तामिळनाडूतील तेलगू देशम पक्षाने २९ या सर्वाधिक जागा जिंकल्यात या प्रादेशिक पक्षाच्या समर्थाने भाजपचे या राष्टीय पक्षाचे शासन केंद्रात आले आहे. या सरकार मध्ये प्रादेशिक पक्षांना मंन्त्रिमंडळात महत्वाचे स्थान दिलेले दिसते.

राष्टीय राजकारणात प्रादेशिक पक्षाच्या मताचा आदर राष्ट्रीय पक्षांना घ्यावा लागतो. भाजपने सत्तेवर येण्यासाठी प्रादेशिक पक्षाचे सहकार्य घेताना आपल्या जाहिरणाम्यातील राम भूमि समान नागरीक कायदा या सारखे प्रश्न बाजूला ठेवून सहमतीचे राजकारण करून सत्तेच्या पांठीबासाठी समझोता केला. प्रादेशिक पक्ष सूध्दा आपला प्रभाव वाढूवून दबावाच्या राजकरणातून आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी मान्य करून घेतात

२. **१४ व्या लोकसभा निवडणुकीत २००४**ः२००४ च्या निवडूणूकीत प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढलेले दिसते प्रादेशिक पक्षांनी स्थानिक मूद्दे घेऊन निवडणूक लढवली असली तरी या पक्षांना राष्ट्रीय पक्षांना आमने सामने लढ घऊन आपले अस्तित्व सिध्द केले आहे. राष्टीय पक्षांना निवडणूकी पूर्व कीवां निवडाणूकीनंतर ही सत्तेसाठी प्रादेशिक पक्षांची मदत घ्यावी लागली. २००४ च्या निवडणूकीत राष्टीय कॉग्रेस पक्ष व भाजप या राष्ट्रीय पक्षांना संयुक्त प्रगतशिल गटबंधन आणि राष्ट्रीय लोहशाही गटबंधन निर्माण केले. ज्या मध्ये भारतातील विविध प्रादेशिक पक्ष विभागलेले होते.

खालील तक्तामध्ये २००४ च्या निवडाणूकीत प्रादेशिक पक्षांना मिळालेल्या लोकसभा निवडाणूकीची आकडेवारी दिली आहे

| पक्षाचे नाव | प्राप्त जागा | | पक्षाचे नाव | प्राप्त जागा |
|---|---|---|---|---|
| अन्ना द्रमुख | ०९ | | तृणमूल कांग्रेस | १९ |
| शिरोमणि अकाली दल | ०४ | | समाजवदी पार्टी | ३३ |
| ऑल इण्डिया फॉरवर्ड ब्लॉक | | | राष्ट्रीय जनता दल | २० |
| नॅशनल कॉन्फ्रेन्स | ०४ | | द्रविड मुनेत्र कडगम | १८ |
| शिवसेना | ११ | | आसाम गण परिषद | ०१ |
| तेलगू देसम | ०६ | | बीजू जनता दल | १४ |
| झारखंड मुक्ती मोर्चा | ०२ | | तेलंगणा राष्ट्र समिती | ०२ |
| जनता दल | ०३ | | हरियाना जनहीत | ०१ |
| रिपब्लीकण पार्टी ऑफ इंडीया | ०१ | | एम.एन.एफ | ०० |

**३ २००९ व्या लोकसभा निवडणूकीत प्रादेशिक पक्षानां प्राप्त झालेल्या जागा.**

२००९ च्या निवडणुकीत राष्ट्रीय कांग्रेसने तृणमूल कांग्रेस, द्रविड कळघम ,नॅशनल कांग्रेस या प्रादेशिक पक्षाबरोबर युती केली व केंद्रात सरकार बनवले. वरील १९९९, २००४ व २००९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये प्रादेशिक पक्षांचा मिळालेल्या जागा पाहिल्या असता प्रादेशिक पक्षाच्या सहकार्याशिवाय केंद्रातील सरकार बनवने राष्ट्रीय पक्षांना अशक्य आहे. या प्रादेशिक पक्षांन सत्तेत सहभागी करून त्यांना केंद्रातील मंत्री पदे दिली आहेत.या पक्षाच्या पांठीब्यावर केंद्रातील सरकार चालेले दिसते. प्रादेशिक पक्षांच्या जागा आपल्याला प्रत्येक निवडणुकीत कमी जास्त झालेल्या दिसतात. पण यामुळे त्यांचे महत्व कमी होत नाही. संघराज्य शासन पध्दती केंद्रा इतकेच राज्यालाही स्थान असते पण १९९० पर्यत या गोष्टीचा जास्त विचार झाला नाही पण प्रादेशिक पक्षाच्या वाढत्या प्रभावाने राज्यानांही धोरण ठरवताना महात्वपूर्ण स्थान देण्यात आले. ज्यामुळे प्रत्येक राज्याला आपल्याला आवश्यक असलेल्या गरजांची मागणी करणे सुलभ झाले. यामुळे विविधतापूर्ण भारतातील आशा आंकाक्षाचे प्रतिबिंबे उमटू लागले.भारतीय राजकारणातील येणारा काल हा प्रादेशिक पक्षांचा असेल प्रादेशिक पक्षांना डावलून कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला केंद्रात सत्ता स्थापने अवघड आहे. प्रादेशिक पक्षांना त्यांच्या क्षेत्रत मिळत असलेला जनाधार व राष्ट्रीय पक्षांची घटत चाललेला जनाधार भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे महत्व अधोरेखित करते. पण काहि टिकाकारांच्या मते प्रादेशिक पक्ष हे संकुचित दृष्टिकोण स्विकारतात ते देशाचा विचार न करता पक्त आपल्या प्रदेशाचा विचार करतात तसेच राष्ट्रीय राजकारणात अव्यवस्थेचे स्वरूप प्राप्त करून देतात. परंतु अशी टिका होत असली तरी प्रादेशिक पक्षाचे केंद्राच्या राजकारणात प्रवेश झाल्या पासून त्यांचा दृष्टीकोण बदललेला दिसत आहे व पुढील काळात या पक्षांना आपली व्यापकता वाढवलेली दिसेल.

**समारोप** ः भारतात होऊ घातलेल्या २०१४ च्या निवडणूकीत प्रादेशिक पक्षांचे महात्त्व वाढलेले दिसू येईल कारण अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षाच्या सरकारने चांगल्या कामगिरी केल्याने तेथील जनता त्यांना पांठीब देईल यामुळेच राष्ट्रीय पक्ष या प्रादेशिक पक्षांच निवडणुकी आधि युती करण्याचा प्रयत्न करताना दिसतात पुढील काळात प्रादेशिक पक्षांची पक्त आघाडी होऊन राष्ट्रीय पक्षाच्या सहाकार्य शिवाय सत्ता प्राप्त केल्यास नवल वाटणार नाही.

**संदर्भ सूची** ः १.भारतीय शासन व राजनीति डॉ.बी.एल. फडिया साहित्य भवन पब्लिकेशन २००८
२.भारतीय शासन व राजकारण डॉ.ए.पी.अवस्थी लक्ष्मी नारायन अग्रवाल २०१३
३.भारतीय राजकीय व्यवस्था प्रा.र.घ.वराडकर निरली प्रकाशन १९९७
४.एन.सी.आर.टी. बुक
५.www.indianelection .org